3.8.2024
आ.क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०३/०४/२०२४

## प्रेसनोट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,यांच्या विचाराने प्रेरित होऊन महाराष्ट्रात सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या आणि अनेक रेकॉर्डची नोंद करणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिकेतील सहा.संचालक, नगररचना ललीत खोब्रागडे व त्यांची पत्नी अर्चना खोब्रागडे यांच्या नागपुरमधील बोधी फाऊंडेशनच्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन त्यांना दि. १२ मार्च रोजी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत कुमार भांगे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल व २५ हजाराचा धनादेश देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. याची दखल घेऊन आज दि.०३/०४/२०२४ रोजी प्रशासक तथा आयुक्त, अजिज शेख यांच्या मार्फत सहा. संचालक ललीत खोब्रागडे व त्यांची पत्नी व मुलगी यांचा स्थायी समिती सभागृहात जाहीर सत्कार करुन त्यांना गौरविण्यात आला.

आयुक्त अजिज शेख यांनी खोब्रागडे दाम्पत्याने केलेल्या सामाजिक बांधिलकीतून केलेल्या कार्यांचा गौरव करुन त्यांचे कौतुक केले.

यावेळी सहा.संचालक ललीत खोब्रागडे व त्यांच्या पत्नी अर्चना खोब्रागडे यांनी आपल्या खडतर आयुष्याचे अनुभव सांगून आपला जीवनप्रवास सर्वांसमोर मांडला.

सदर सत्कार समारंभास अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त किशोर गवस व डॉ.सुभाष जाधव, मोहिनी धर्मा, वैद्यकीय अधिकारी, प्रदीप जगताप संचालक वर्ल्ड बुध्दीष्ठ सर्कल, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, उपलेखा अधिकारी निलम कदम, सिस्टम ॲनलिस्ट श्रध्दा बाविस्कर, सहा. आयुक्त गणेश शिंपी, मनिष हिवरे, दत्तात्रय जाधव, विभाग प्रमुख अंकुश कदम, अच्युत सासे, विशाखा सांवत, राजा बुलानी, नितेश रंगारी इ. अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.